**शैक्षणिक वर्ष २०२२-२३ साठी अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या "स्वनाथ शिष्यवृती योजना" अंतर्गत प्राप्त अर्ज तपासणी करताना करावयाच्या कार्यवाहीबाबत..........**

**सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई**
जागतिक बँक प्रकल्पांतर्गत इमारत, पहिला मजला, शासकीय
तंत्रनिकेतन परिसर ४९, खेरवाडी, अलियावार जंग मार्ग,
वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१.
फोन नं.२६४७ ४८९२
टेलीफॅक्स नं.२६४७ १६१९

क्र. ४/विकामुं/तांशि/शिष्यवृत्ती/२०२२/३३७६
दिनांक : 07 OCT 2022

संदर्भ : मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांचे पत्र क्र. १८/तंशिसं/स्वनाथ-शिष्य/विकाप/२०२२-२३/२४८, दि. ३०/०९/२०२२

सर्व संबंधीत संस्थांना संदर्भाकीत पत्रान्वये कळविण्यांत येते की, **"स्वनाथ शिष्यवृती योजना"** अंतर्गत प्राप्त अर्ज तपासणी करताना करावयाच्या कार्यवाहीबाबत दिलेल्या निर्देशांचे सर्व संस्थांनी अवलोकन करावे. संदर्भीय पत्राची प्रत माहितीस्तव सोबत जोडण्यांत आली आहे.

**"स्वनाथ शिष्यवृती योजना"** या योजनेची मार्गदर्शक तत्वे / FAQ नुसार ज्या विद्यार्थ्यांच्या आई वडीलांचा किंवा दोघांपैकी एकाचा **कोविड-१९ मुळे मृत्यू झाला आहे.** अशा विद्यार्थ्यांच्या पालकाचे मृत्यू प्रमाणपत्रावर मृत्यूचे कारण **"कोविड-१९ मुळे मृत्यू"** असे नमूद असणे आवश्यक आहे.

तंत्रशिक्षण संचालनालयाचे पत्र क्र. १८/तंशिसं/एनएसपी/संस्था-पत्र/२०२१-२२/१०, दि. १७/०१/२०२२ अन्वये कळविण्यांत आलेले होते की,

१. ज्या विद्यार्थ्यांच्या पालकाचे मृत्यू प्रमाणपत्रावर मृत्यूचे कारण – **"कोविड-१९ मुळे मृत्यू"** असे कारण नमूद असलेले मृत्यू प्रमाणपत्र अर्जासोबत Upload करावे. किंवा

२. ज्या विद्यार्थ्यांच्या पालकाचे मृत्यू प्रमाणपत्रावर मृत्यूचे कारण **कोविड-१९ मुळे मृत्यू** असे नमूद नसेल तर त्यांनी नॅशनल स्कॉलरशिप पोर्टलवर अर्ज करतेवेळी, मृत्यू प्रमाणपत्रासोबत **कोविड-१९ मुळे मृत्यू नमूद असलेली रुग्णालयाची Discharge Slip/Form No.4/Form No.4A** अपलोड करावे.

वरील सूचना यापूर्वी देण्यांत आलेल्या असूनही शै.व. २०२२-२३ करिता **"स्वनाथ शिष्यवृती योजना"** या योजने अंतर्गत प्राप्त होणारे काही विद्यार्थ्यांचे अर्ज उक्त १ व २ च्या सूचनेमध्ये नमूद केलेली कागदपत्र अपलोड न करताच पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यांत येत असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे असे अर्ज "Defective" मार्क करुन कारणांसह परत पाठविण्यांत येतात. जेणेकरुन विद्यार्थ्यांना त्रुटी दूर करुन परत जमा करता येईल.

...२.

तरी संस्थांना कळविण्यांत येते की, **"स्वनाथ शिष्यवृती योजनेचे"** अर्ज पुढे पाठविताना वरील १ व २ अन्वये दिलेल्या सूचने अन्वये योग्य कारण नमूद असलेल्या **प्रमाणपत्रासह किंवा Discharge Slip/Form No.4/Form No.4A** इ. अपलोड केलेले अर्जच पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यांत यावेत.

**(शर्वरी नि. ढेपे)**
सहाय्यक संचालक (तां.)
तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, मुंबई

प्रत माहितीसाठी : मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई

F/C

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य.

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४८६ / ४८७
ई-मेल—desk१८@dtemaharashtra.gov.in. वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

पोस्ट /ई-मेलद्वारे

क्र.१८/तंशिसं/स्वनाथ-शिष्य/विकाप/२०२२-२३/ २४८
दिनांक : ३०/ ०९ / २०२२

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर

विषय :- **शै.वर्ष २०२२-२३ साठी अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या "स्वनाथ शिष्यवृत्ती योजना" अंतर्गत प्राप्त अर्ज तपासणी करताना करावयाच्या कार्यवाहीबाबत ....**

संदर्भ :-१. संचालनालय पत्र क्र.१८/तंशिसं/एआयसीटीई-शिष्य/विकाप/२०२२-२३/२०७ दि.०५/०८/२०२२
२. संचालनालयाचे पत्र क्र.१८/तंशिसं/एनएसपी/संस्था-पत्र/२०२२-२३/२११ दि.१२/०८/२०२२
३. संचालनालयाचे पत्र क्र.१८/तंशिसं/एनएसपी/संस्था-पत्र/२०२१-२२/१० दि.१७/०१/२०२२

अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद्रेची मंजूरी असलेल्या संस्था व तांत्रिक अभ्यासक्रमांमध्ये (पदविका,पदवी) शिकणाऱ्या **अनाथ किंवा ज्या विद्यार्थ्याचे आई वडील दोघेही किंवा दोघांपैकी एक कोव्हिड-१९ ने मृत्यू पावले आहेत किंवा ज्या विद्यार्थ्यांचे पालक सशस्त्र दल आणि केंद्रीय निमलष्करी दलांच्या कारवाईमध्ये शहीद झाले आहेत अशा** विद्यार्थ्यांसाठी **स्वनाथ शिष्यवृत्ती** योजना सन २०२१-२२ पासून सुरु करण्यात आलेली आहे. सदर योजनेच्या महाराष्ट्र राज्यामधील अंमलबजावणीकरिता तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना नोडल ऑफिस म्हणून घोषित करण्यात आलेले आहे. सदर योजनेसाठी पात्र विद्यार्थ्यांकडून शै.वर्ष २०२२-२३ साठीचे अर्ज भरण्याबाबत संदर्भ क्र.१ च्या पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे.

**"स्वनाथ शिष्यवृत्ती योजना"** या योजनेच्या मार्गदर्शक तत्वे / FAQ नुसार, **ज्या विद्यार्थ्यांच्या आई वडीलांचा किंवा दोघांपैकी एकाचा कोविड-१९ मुळे मृत्यू झाला आहे** अशा विद्यार्थ्यांच्या पालकाचे मृत्यू प्रमाणपत्रावर मृत्यूचे कारण - **कोविड-१९ मुळे मृत्यू** असे नमूद असणे आवश्यक आहे.

**"स्वनाथ शिष्यवृत्ती योजना"** अंतर्गत मागील वर्षी (सन २०२१-२२) विद्यार्थ्यांनी भरलेले परंतु विद्यार्थ्यांच्या पालकाच्या मृत्यू प्रमाणपत्रावर "मृत्यूचे कारण - **कोविड-१९ मुळे मृत्यू**" नमूद नसलेले अर्ज संस्थेकडून मंजूरी देऊन या कार्यालयाकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात आले होते. याबाबत आपल्या अधिपत्याखालील सर्व संस्थांना सुचित करण्यासाठी संदर्भ क्र.३ च्या पत्राने खालीलप्रमाणे कळविण्यात आलेले होते.

१. ज्या विद्यार्थ्यांच्या पालकाचे मृत्यू प्रमाणपत्रावर मृत्यूचे कारण - **कोविड-१९ मुळे मृत्यू** असे कारण नमूद असलेले मृत्यू प्रमाणपत्र अर्जासोबत Upload करावे. **किंवा**



सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई-०१
आवक क्रमांक : 5989
दिनांक 30 SEP 2022

२. ज्या विद्यार्थ्यांच्या पालकाचे मृत्यू प्रमाणपत्रावर मृत्यूचे कारण **कोविड-१९ मुळे मृत्यू** असे नमूद नसेल तर त्यांनी नॅशनल स्कॉलरशिप पोर्टलवर अर्ज करतेवेळी, मृत्यू प्रमाणपत्रासोबत **कोविड-१९ मुळे मृत्यू** नमूद असलेली रुग्णालयाची Discharge Slip / Form No.४ / Form No. ४A अपलोड करावे.

वरील सूचना यापूर्वी देण्यात आलेल्या असून देखील, **शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करिता, "स्वनाथ शिष्यवृत्ती योजना"** अंतर्गत काही विद्यार्थ्याचे अर्ज पालकाच्या मृत्यू प्रमाणपत्रावर "मृत्यूचे कारण - **कोविड-१९ मुळे मृत्यू**" असे नमूद नसतानाही संस्थेकडून मंजूर करुन या कार्यालयाला पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात आले आहेत. या कार्यालयाकडून अर्ज तपासणी करतेवेळी असे अर्ज "Defective" मार्क करुन कारणासह परत पाठविण्यात येतात. जेणेकरुन विद्यार्थ्यांना त्रुटी दूर करुन परत जमा करता येईल.

तरी विभागीय कार्यालयांनी कळविण्यात येते की, त्यांनी पुन:श्च त्यांच्या अधिपत्याखालील सर्व संस्थांना **"स्वनाथ शिष्यवृत्ती योजना"** अंतर्गत अर्ज मंजूर करतेवेळी पालकाच्या मृत्यू प्रमाणपत्र संदर्भात दिलेल्या उपरोक्त सूचनानुसार अर्ज तपासून पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्याबाबत व संस्थांना उपरोक्त योजनेसाठी पात्र असलेल्या विद्यार्थ्यांना, अर्ज करतेवेळी, अर्जासोबत अपलोड करण्यात येणाऱ्या पालकाच्या मृत्यू प्रमाणपत्र संदर्भात दिलेल्या उपरोक्त सूचनानुसार मार्गदर्शन करण्याबाबत कळविण्यात यावे. जेणेकरुन पात्र विद्यार्थ्यांना योजनेचा लाभ घेता येईल.

( डॉ. अभय वाघ )
संचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय, म. रा. मुंबई.

प्रत - मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, ४ था मजला, मंत्रालय, मुंबई यांना माहितीसाठी सविनय सादर.